आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
रविवार, दिनांक २४ मार्च २०२४

ठळक बातम्या

1. देशभरात होळी सणाचा उत्साह- उद्या धुळवडीची जय्यत तय्यारी.

2. लोकसभा निवडणुकीसाठी नागपूरहून विकास ठाकरे तर रामटेकसाठी रश्मी बर्वे यांना काँग्रेसची उमेदवारी जाहीर.

3. वृद्ध आणि दिव्यांग व्यक्ती करू शकणार घरून मतदान-सुलभतेसाठी निवडणूक आयोगाचं सक्षम **ॲ**प सुरू.

4. आज मेळघाट मार्गे जाणाऱ्या बसचा खोल दरीत कोसळून अपघात तर काल वर्ध्यात झालेल्या अपघातात तीन जणांचा जागीच मृत्यू.

*****

होळी सण

देशभर आज होळीचा सण उत्साहात साजरा होत असून, उद्या होणाऱ्या धुळवडीचीही जोरदार तयारी सर्वत्र पाहायला मिळत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समाजमाध्यमावरून नागरिकांना होलिकादहन आणि उद्याच्या धूलिवंदनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. राज्यपाल रमेश बैस यांनी देखील शुभेच्छा देतांना परस्पर प्रेम, स्नेह आणि बंधुभावाचं प्रतिक असलेला रंगांचा हा सण सर्वांच्या जीवनात आनंदाचे रंग भरो, देशबांधवांमध्ये असलेली बंधुत्वाची भावना अधिक बळकट करो, अशी प्रार्थना केली आहे. तर होळी निमित्त झाडं तोडू नये, पाण्याचा अपव्यय करु नये, तसंच धुळवड, रंगपंचमी खेळताना कृत्रिम रंगांचा वापर करु नये असं आवाहन पर्यावरणवादी संस्था संघटनांनी केलं आहे. सरंक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी आज लेहमधे सैनिकांबरोबर होळी साजरी केली. देशाच्या सीमांचं रक्षण करण्यासाठी सैनिक सज्ज असल्यामुळेच देशवासियांचं आयुष्य सुरक्षित असल्याचं ते म्हणाले. कर्तव्यपालनासाठी आपल्या कुटुंबापासून दूर राहणारे हे सैनिक प्रत्येक भारतीय कुटुम्बाचा भाग आहेत, असं त्यांनी सांगितलं. दरम्यान, नागपुरात आज सायंकाळी सात वाजेपासून उद्या दिवसभर शहर बस सेवा बंद राहणार आहे. मंगळवारी २६ मार्च रोजी सकाळी सहा वाजेपासून बस सेवा पुर्ववत सुरु होईल अशी माहिती, मनपाच्या परिवहन विभागाद्वारे देण्यात आली आहे.

## मार्गदर्शक सूचना

उन्हाळ्यात रुग्णालयात लागणाऱ्या आगीच्या दुर्घटना टाळण्यासाठी केंद्रीय आरोग्य मंत्रालय आणि राष्ट्रीय आपत्ती प्राधिकरणाने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना त्यांच्या अधिकारक्षेत्रातल्या रुग्णालयासाठी संयुक्त मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. रुग्णालयांची सर्वसमावेशक अग्निसुरक्षा ऑडिट आणि प्रत्यक्ष तपासणी करणे, अग्नी धोक्याचा अलार्म, धूर शोधक यंत्र, फायर हायड्रंट्स आणि फायर लिफ्ट्ससह अग्निरोधक यंत्रणा उपलब्ध आहे आणि ती पूर्णपणे कार्यरत आहे, याची खात्री करणे, अपुऱ्या विद्युतभार क्षमतेमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांचे निराकरण करणे, याचा यात समावेश आहे.

## कांदा निर्यात बंदी

केंद्र सरकारनं कांदा निर्यात बंदीत अनिश्चित काळासाठी वाढ केली आहे. याबाबतची अधिसूचना जारी करण्यात आली आहे. याआधी ३१ मार्चपर्यंत कांदा निर्यात बंदी लागू करण्यात आली होती.

## अजित पवार गट बैठक

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज दुपारी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या शासकीय निवसस्थानी राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या अजित पवार गटाची प्रमुख नेत्यांची बैठक पार पडली. महायुतीमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेसला किती जागा मिळणार? हे अद्याप स्पष्ट झाल नसल तरी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष महायुतीमध्ये सात जागा लढवण्यासाठी इच्छुक आहे. या संदर्भात आज अजित पवार यांच्या निवासस्थानी प्रमुख नेत्यांची बैठक झाली. या बैठकीला माजी केंद्रीय मंत्री प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, मंत्री छगन भुजबळ उपस्थित होते.

## नागपूर /रामटेक लोकसभा मतदार संघ

काँग्रेसने लोकसभा निवडणुकीसाठी काल ४६ उमेदवारांची आणखी एक यादी जाहीर केली. यामध्ये रामटेक इथून रश्मी बर्वे, नागपूरहून विकास ठाकरे, भंडारा-गोंदिया डॉ प्रशांत पडोळे तर गडचिरोली-चिमूर मतदार संघातून डॉ नामदेव किरसन यांना उमेदवारी जाहीर केली आहे. काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष असलेले, विकास ठाकरे यांनी नागपूर मनपात नगरसेवक, महापौर अशी पदे भूषवली असून, त्यांनी २०१९ ला भाजपचे आमदार सुधाकर देशमुख, यांना पराभूत करून, पश्चिम नागपूरची विधानसभेची जागा जिंकली होती. रामटेक हा मतदारसंघ अनुसूचित जातीसाठी राखीव आहे आणि त्यासाठी उमेदवारी मिळालेल्या रश्मी

बर्वे , नागपूर जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष राहिल्या आहेत. तर गडचिरोली-चिमूर लोकसभा क्षेत्रातून, उमेदवारी मिळालेले डॉ.नामदेव किरसान हे उत्पादन शुल्क विभागात अधीक्षक आणि त्यानंतर उपायुक्त म्हणून १८ वर्षे नोकरी केल्यानंतर, २००८ पासून काँग्रेस पक्षात सक्रिय आहेत. दरम्यान, पहिल्या टप्प्यातल्या मतदानासाठी राज्यात आतापर्यंत दहा जणांनी लोकसभेसाठी उमेदवारी अर्ज भरले असून, नागपूरमध्ये पाच, रामटेकमध्ये एक, भंडारा-गोंदिया आणि गडचिरोली-चिमूर मतदारसंघात प्रत्येकी दोघांनी उमेदवारी अर्ज भरल्याची माहिती, राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी, एस.चोकलिंगम यांनी काल मुंबईत पत्रकार परिषदेत दिली.

<u>निवडणूक आयोग/सक्षम अँप</u>

८५ वर्षांवरील मतदार आणि ४० टक्के बेंचमार्क अपंगत्व असलेल्या व्यक्ती घरबसल्या मतदान करू शकतात, असं निवडणूक आयोगानं जाहीर केलं आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक मतदान केंद्रावर स्वयंसेवक आणि व्हीलचेअर देखील उपलब्ध करून देण्यात येतील तसंच अपंग व्यक्ती आणि वृद्धांसाठी निवडणूक यंत्रणा वाहतूक सुविधेची व्यवस्था करत आहे असं निवडणूक आयोगातर्फे सांगण्यात आलं आहे. दिव्यांग व्यक्तींना मतदान करण सुलभ व्हावं तसंच त्यांना मतदान केंद्रांवर सुविधांचा लाभ घेता यावा यासाठी आयोगाने सक्षम **ॲ**प सुरू केले आहे. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना निवडणूक प्रक्रियेची भेट म्हणून शाळांमध्ये कायमस्वरूपी खात्रीशीर किमान सुविधा AMF देण्यावरही जोर दिला जात आहे. खात्रीशीर किमान सुविधांमध्ये पिण्याचे पाणी, शौचालये, साइनेज, रॅम्प किंवा व्हीलचेअर, मतदार सुविधा केंद्र, पुरेसा प्रकाश आणि छत यांचा समावेश आहे. काही मतदान केन्द्रे हि दिव्यांग व्यक्तींद्वारे आणि महिलांद्वारे व्यवस्थापित केलेली तर काही मॉडेल मतदान केंद्रे देखील स्थापित केली जाणार आहेत.

<u>मिशन डिस्टिंक्शन</u>

मागील लोकसभा निवडणुकीत मतदानाचं प्रमाण लक्षात घेता 75 टक्क्यांपेक्षा अधिक मतदान व्हाव या उद्देशाने स्वीप अंतर्गत MissionDistinction75% हा अभिनव उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या अंतर्गत शालेय मुले आता आई-बाबांना संकल्प पत्राद्वारे मतदान करण्याचं आवाहन करणार आहेत. हे 'संकल्प पत्र' मुले पालकांकडून भरून घेणार आहेत. अधिकाधिक मतदारांनी मतदान करावं, जिल्ह्याचे मिशन डिस्टिंक्शन हे ध्येय पूर्णत्वास यावं , मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी स्वीप अंतर्गत हा उपक्रम

राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असून,  मुलांच्या आवाहनाला आई-बाबा सकारात्मक प्रतिसाद देऊन सर्वाधिक संख्येने मतदान करतील, असा विश्वास नागपूरचे  जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी व्यक्त केला.

भंडारा गोंदिया-निवडणूक तयारी

लोकसभा 2024 साठी भंडारा  जिल्ह्यातील पूर्वतयारीला वेग आला असून आज मतदान पथकांचे प्रशिक्षण, रॉयल पब्लिक स्कूल इथं  घेण्यात आले. आतापर्यंत निवडणूक आयोगाने दिलेल्या कार्यक्रमानुसार प्रशिक्षणाचे सत्र आयोजित करण्यात आले आहेत. पहिल्या रँडमाइझेशन प्रक्रियेनंतरचं  हे  पहिलं प्रशिक्षण आहे . दुसऱ्या रँडमायझेशन नंतर पुन्हा मतदान पथकांचे प्रशिक्षण घेण्यात येईल, असं  उपविभागीय अधिकारी तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी गजेंद्र बालपांडे यांनी सांगितलं. आज या प्रशिक्षण वर्गामध्ये 1 हजार 640 लोकांना दोन सत्रांमध्ये प्रशिक्षण देण्यात आले.

सुधीर मुनगंटीवार

माझ्या प्रत्येक कार्यकर्त्यानं  आपणच निवडणुकीत उमेदवार आहोत या भावनेनं  काम कराव, असं  आवाहन महाराष्ट्राचे वने, सांस्कृतिक कार्य आणि मत्स्यव्यवसाय मंत्री व चंद्रपूर मतदारसंघाचे भाजपचे लोकसभेचे उमेदवार  सुधीर मुनगंटीवार यांनी केलं . काल राजुरा इथं  विधानसभा पदाधिका-यांची बैठक  पार पडली. या बैठकीला सुधीर मुनगंटीवार संबोधित करत होते. यंदा लोकसभेची निवडणूक ऐतिहासिक ठरणार असून देशाच्या विकासाची गाडी 'बुलेट ट्रेन'पेक्षा वेगाने धावेल,असा विश्वास त्यांनी चंद्रपुरात आयोजित एका कार्यक्रमात व्यक्त केला.

चंद्रपूर चेकपोस्ट पाहणी

संपूर्ण चंद्रपूर जिल्ह्यात निवडणूक प्रक्रिया शांततेत आणि नि:पक्षपणे राबविण्यासाठी जिल्हा प्रशासन कटिबध्द आहे. आदर्श आचार संहितेची प्रभावी अंमलबजावणी तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्ह्यात विविध पथकांचे गठन करण्यात आले आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून जिल्ह्याच्या सीमेवर तैनात स्थायी निगराणी पथकांनी जिल्ह्यात प्रवेश करणा-या वाहनांची कडक तपासणी करावी, असे निर्देश नुकतेच चंद्रपूर जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी विनय गौडा यांनी दिले.

अपघात

आज अमरावती वरून मेळघाट मार्गे मध्य प्रदेशात जाणाऱ्या बसच्या अपघातात दोन महिलांचा मृत्यु झाला असून २५ जण जखमी झाले आहेत. इंदू गणात्रे, आणि ललिता चिमोटे अशी या मृतक महिलांची नावं आहेत. परतवाडा आगाराची ही बस सेमाडोह ते जोहारकुंड दरम्यान 40 ते 50 फूट खोल दरीत कोसळून हा अपघात झाला. जखमींना सेमाडोह इथल्या प्राथमिक आरोग्य केंद्रात भरती करण्यात आलं आहे. तर काल रात्री वर्धा तालुक्यातील मानकापूर चौरस्त्यावर झालेल्या अपघातात तीन व्यक्तींचा जागीच मृत्यू झाला तर दोन व्यक्ती गंभीर जखमी असून त्यांच्यावर सेवाग्राम येथील रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

हवामान

प्रादेशिक हवामान विभागानं वर्तविलेल्या अंदाजानुसार आज आणि उद्या, विदर्भात आकाश अंशतः अभ्राच्छादित राहणार असून, गेल्या चोवीस तासात विदर्भात कमाल तापमान, यवतमाळ इथ ४०.५ अंश सेल्सियस नोंदविण्यात आलं.

*****